**महाराष्ट्र शासन**
**भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती.**
**जीवशास्त्र विभागाची जुन ईमारत, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परीसर, व्हि.एम.व्हि.रोड, अमरावती- ४४४ ६०४**
**दुरध्वनी क्रमांक - ०७२१- २५३०२१४ ई-मेल - director@gpiasamt.org website - www.gpiasamt.org**

## प्रवेश परीक्षा - २०१८

केंद्रिय लोक सेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षा- २०१९ च्या पुर्व प्रशिक्षणासाठी विनामुल्य प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती येथील प्रवेशासाठी **रविवार दिनांक १४-१०-२०१८** रोजी प्रवेश परीक्षा फक्त अमरावती केंद्रावर घेतली जाणार आहे. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेल्या अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडुन ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. प्रवेश क्षमता - एकुण - ७० - अ) भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती - ६०
ब) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (BARTI) द्वारा अनुदानित- १०

२. प्रवेश परीक्षा पध्दती- प्रवेश परीक्षा - २०० गुणांची असेल, त्यात भाग-१, सामान्य अध्ययन - १०० गुणांचा असेल व भाग - २ सीसॅट- १०० गुणांचा असेल. युपीएससी नागरी सेवा परीक्षा प्रमाणे गुणवत्ता यादी भाग - १, सामान्य अध्ययन या भागावरील गुणांवर आधारीत राहील, त्याकरीता भाग- २ सीसॅट या भागामध्ये किमान ३३% म्हणजेच १०० पैकी ३३ गुण असणे अनिवार्य आहे. तसेच नागरी सेवा परीक्षा अभ्यासक्रमावर आधारीत येथील प्रवेश पुर्व परीक्षा असेल.

३. परीक्षेची वेळ - सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत राहील. ( २ तास )

४. सीईटी वस्तुनिष्ठ स्वरुपाची राहील व प्रत्येक चुकीच्या उत्तराला १/३ किंवा ३३% एवढे गुण कमी करण्यात येईल.

५. प्रवेश परीक्षा अर्हता :- अ. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण .

ब. उमेदवाराचे वय **०१ ऑगस्ट, २०१९** रोजी - २१ ते ३२ वर्ष - खुला संवर्ग
२१ ते ३५ वर्ष - इ.मा.व. / वि.मा.प्र./वि.जा./ भ.ज.
२१ ते ३७ वर्ष - अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती
( सदर वयोमर्यादा युपीएससी प्रमाणे असुन दि. १ ऑगस्ट २०१९ रोजी उमेदवारांचे वय कमी किंवा जास्त नसावे. )

क. उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी असला पाहिजे (Domiclle of Maharashtra Certificate)

किंवा

शा.नि.क्र. रा.प्र.व्य.-१०१८/(१७१/९८)/मशि-१ दिनांक- २४.०४.२००० नुसार उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रत सीमा भागातील रहिवासी असल्यास त्याची/त्याच्या अर्जात तो/ती पात्रता परीक्षा महाराष्ट्र कर्नाटक वादग्रत सीमा भागातील निर्देशित गांव किंवा शहरातील संस्थेमधून उत्तीर्ण झाल्याचे नमुद करणे आवश्यक असेल.तसेच अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनीचे पालक महाराष्ट्र कर्नाटक वादग्रत सीमा भागातील रहिवासी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि विद्यार्थी पात्रता परीक्षा संस्थेतून झाल्याचे व त्याची/तीची मातृभाषा मराठी असल्याचे संस्थेच्या प्राचार्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच १० वी ची परीक्षा मराठी विषय घेवून उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

ड. भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती च्या पुर्व परीक्षा अथवा मुख्य परीक्षा प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

इ. संस्थेच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमात सहभाग घेता येणार नाही.

फ. वैद्यकीय पदवी धारकांनी Intership पुर्ण करणे आवश्यक आहे.

६. परीक्षेसंबंधीत महत्वाची माहिती :- **प्रवेश अर्ज ऑनलाईनवर भरण्याचे वेळापत्रक**

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज शुल्कासह भरण्याचा कालावधी | दि. २७.०८.२०१८ ते दि. २६.०९.२०१८ |
| ३. | लेखी परीक्षेसाठी प्रवेश पत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | दि. ०१.१०.२०१८ ते दि. १४.१०.२०१८ |

* प्रवेश अर्ज शुल्क (by online gateway )- रु.३००/- खुला संवर्ग व रु.१५०/- अ.जा./अ.ज./ वि.जा./ भ.ज./ इ.मा.व./ वि.मा.प्र. साठी.

* परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती, सूचना संस्थेच्या www.preiasamt.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर माहिती पोष्टाने पाठविण्यात येणार नाही.

* प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज व कोणतेही शैक्षणिक अर्हते बाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येवू नयेत. प्रमाणपत्रे अंतिम निवड प्रक्रियेमध्ये तपासण्यात येतील.

* ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी www.preiasamt.in या संकेतस्थळावरील सुचना काळजीपुर्वक वाचून त्याप्रमाणे अर्ज भरावा.

७. संस्थेतील प्रवेश व मर्यादित वसतिगृह प्रवेश उपलब्धतेनुसार व प्रचलीत शासन निर्णय व नियमांनुसार प्रवेश देण्यात येईल.

८. प्रवेश परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी मोबाईल फोन, माहिती तंत्रज्ञान साधने व किंमती वस्तु जवळ बाळगु नये.

स्वा/-

दिनांक - २४/०८/२०१८

डॉ. मुरलीधर प्र. वाडेकर,
प्र.संचालक,
भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती